आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँकेकडून सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा, रेपो दर पाव टक्क्यांनी कमी करुन सव्वा ६ टक्क्यांवर

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकी दरम्यान वाढलेल्या मतदार संख्येची चौकशी करण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी

- पाकिस्तानातल्या ६८ हिंदू भाविकांचं प्रयागराज इथं कुंभमेळ्यात स्ना◌ान

**आणि**

- चीनमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या आशियाई हिवाळी क्रीडा स्पर्धांमध्ये भारताच्या ५९ खेळाडूंचा सहभाग

**<><><><><>**

सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा देत रिझर्व्ह बँकेनं आज रेपो दरात पाव टक्क्यांची कपात केली. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत एकमतानं हा निर्णय झाला. त्यामुळं रेपो दर साडे ६ टक्क्यांवरुन सव्वा ६ टक्के झाल्याची माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. या समितीच्या निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड**

*रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक बुधवारपासून मुंबईत सुरू झाली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयांची घोषणा करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, समितीनं एकमतानं रेपोदर कपातीचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी कोरोना काळात मे २०२० मध्ये बँकेनं व्याजदर पाव टक्क्यानं कमी केले होते. दोन*

*वर्षांपूर्वी फेब्रुवारी पाव टक्क्यानं दरवाढ केल्यानंतर या दरांमध्ये अजिबात बदल झालेला नव्हता.*

*जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं आज आर्थिक वृद्धीदरांच्या अंदाजातही कपात केली. चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. पतधोरण आढावा समितीच्या गेल्या बैठकीनंतर हा दर ६ पूर्णांक ६ टक्के राहील, अशी शक्यता वर्तवली होती. आगामी आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धीदराचा अंदाजही ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन ६ पूर्णांक ७ दशांश टक्के, इतका कमी करण्यात आला आहे. चलनवाढीच्या दराच्या अंदाजातही रिझर्व्ह बँकेनं कपात केली आहे. चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ४ पूर्णांक ८ दशांश टक्के आणि पुढच्या आर्थिक वर्षात ४ पूर्णांक २ टक्के राहिल, असं रिझर्व्ह बँकेच मत आहे.*

*बँकांमधले घोटाळे कमी करण्यासाठी बँकांच्या वेबसाइटच्या नावात bank.in लावण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. एप्रिलपासून याची सुरुवात होईल. त्यानंतर वित्तीय क्षेत्रातल्या इतर संस्थांच्या वेबसाइटच्या नावात 'fin.in' असा वापर केला जाईल. २४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या यंदाच्या वित्तीय साक्षरता आठवड्याचा भर आर्थिक निर्णय घेण्यासाठी आणि घरखर्चातली महिलांची भूमिका सक्षम करण्यासाठी असेल, असंही रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलंय.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून अंकिता आपटे .*

**<><><><><>**

देशात युरिया खतांचा तुटवडा नाही. नफा मिळवण्यासाठी बाजारात युरियाची अनावश्यक टंचाई निर्माण करणाऱ्यांवर राज्य सरकारांनी कारवाई करावी, असं

आवाहन आज केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे. पी. नड्डा यांनी राज्यसभेत केलं. समाजवादी पार्टीचे खासदार आनंद भदौरिया यांनी उत्तर प्रदेशात युरिया खतांचा तुटवडा असल्याचा दावा केला. मात्र, तो नड्डा यांनी फेटाळून लावला. युरिया खतांचा पुरवठा योग्य रितीने होत असून त्याचे तपशील मंत्रालयाकडे उपलब्ध आहेत, असंही नड्डा यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या वर्षा अखेरीपर्यंत ४ हजार ३०० पेक्षा जास्त FPO, म्हणजेच शेतकरी उत्पादक संस्थांनी ई-नाम पोर्टलवर नोंदणी केली असून, या संस्थांमधल्या ४ कोटी ८० लाख शेतकऱ्यांना २४९ कोटी रुपये देण्यात आल्याचं कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नांना उत्तर देत होते.

देशातली एकूण २२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेश आंतरराज्य व्यवसायासाठी ई-नाम पोर्टलशी जोडली गेली असून, आंतरराज्य व्यापारा अंतर्गत शेतकऱ्यांना सुमारे ६ हजार कोटी रुपयांची थेट मदत देण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

श्रीलंकन अधिकाऱ्यांनी तामिळनाडूतल्या मच्छिमारांना ताब्यात घेतल्याच्या मुद्द्यावरून आज विरोधी पक्षांच्या खासदारांनी निदर्शनं केली. श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी तामिळनाडूतल्या ९७ मच्छिमारांना अटक केली असून त्यांना परत आणलं पाहिजे, असा मुद्दा द्रमुक खासदार कनिमोळी यांनी लोकसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. लोकसभेत सध्या आगामी आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर चर्चा सुरू आहे.

**<><><><><>**

आर्थिक नियोजन आणि काटकसरीला प्राधान्य देताना कार्यक्षमतेत तडजोड होणार नाही याकडे लक्ष द्यावं, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सांगितलं आहे. भारतीय संरक्षण दल लेखा सेवेच्या नवनियुक्त अधिकाऱ्यांना काल नवी दिल्ली इथं ते संबोधित करत होते. सरकारी नोकरीत कायद्याचा आणि प्रामाणिकपणाचा मार्ग सर्वात सुरक्षित असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त कामेश्वर चौपाल यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. चौपाल हे समर्पित रामभक्त होते, ज्यांनी अयोध्येतल्या राम मंदिराच्या उभारणीत मोलाचं योगदान दिलं. असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात  म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याप्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी महाविकास आघाडीने केली आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज नवी दिल्लीत संयुक्त पत्रकारपरिषदेत ही मागणी केली. राज्यात प्रौढ लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार होते असा आरोप  राहुल गांधी यांनी केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्या ३९ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मतदार याद्यांचा सर्व समावेशक तपशील निवडणूक आयोग आपल्याला देत नाही असं ते म्हणाले. निवडणूक पारदर्शी पद्धतीनं घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे, मात्र उमेदवारानं मागणी करुनही मतपत्रिकांवर मतदान घेतलं जातं नाही असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

कॉंग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागणार असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रीया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राहुल गांधी यांनी पराभवाबद्दल आत्मचिंतन करावं असं ते म्हणाले.

<><><><>

कुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी पाकिस्तानच्या सिंध प्रांतातल्या ६८ हिंदू भाविकांचा जत्था काल प्रयागराज इथं पोहोचला आणि त्यांनी संगमावर पवित्र स्नान केलं. गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर या भाविकांनी आपल्या पुर्वजांसाठी धार्मिक विधी आणि प्रार्थना केली. प्रसारमाध्यमांशी बोलताना यात्रेकरूंनी कुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी आपल्याला त्वरित व्हिसा जारी  केल्याबद्दल भारत सरकारचे आभार मानले.

<><><><>

बांगलादेशमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबुर्रहमान यांचं निवासस्थान जाळलं गेल्याचा भारताने कठोर शब्दात निषेध केला आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलंय, की ही घटना खेदजनक  आहे.

<><><><>

अमेरिकेत आर्थिक वर्ष २०२६ साठी H-1B व्हिसाचा अर्ज ७ मार्च ते  २४ मार्चला दरम्यान करता येईल.  USCIS, अर्थात अमेरिकन  नागरिकत्व आणि इमिग्रेशन सेवेनं याबाबतचं निवेदन जारी केलं आहे.

<><><><>

इस्त्राएलनं काल रात्री लेबनॉनच्या दक्षिण आणि पूर्व भागात अनेक ठिकाणी हवाई हल्ले केले. इस्त्राएलच्या लढाऊ विमानांनी पूर्व लेबनॉनच्या बाल्बेक

जिल्ह्यातल्या पर्वत रांगांमध्ये, तसंच दक्षिण लेबनॉनमध्ये अनेक ठिकाणी हल्ले केल्याचं लेबनॉनच्या वृत्त संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये आजपासून येत्या १४ फेब्रुवारी पर्यंत नवव्या आशियाई हिवाळी क्रीडास्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेतल्या भारतीय तुकडीत ८८ जणांचा समावेश आहे. यात ५९ खेळाडू आणि २९ संघ अधिकारी आहेत.

**<><><><><>**

चेन्नई खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपान्त्य फेरीत आज साकेत मायनेणी आणि रामकुमार रामनाथन या जोडीचा सामना तैवानचा रे हो आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ख्रिस्तोफर रोमियोस या जोडीबरोबर होणार आहे. हा सामना दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. उपान्त्य फेरीतला दुसरा सामना जीवन नेंदुचियान आणि विजय प्रशांत या भारतीय जोडीचा सामना शिंतारो मोचीझुकी आणि कैतो युसुगी या जपानी जोडीबरोबर होणार आहे.

**//<><><><><>//**